RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# दलित साहित्याचे पुरस्कर्ते : प्रज्ञावंत डॉ.भालचंद्र फडके

**संजयकुमार मधुकर सरगडे**
सहायक प्राध्यापक,
मराठी विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

महाराष्ट्र भूमी संत, पंत, तंत त्याचप्रमाणे समाजासाठी अहोरात्र झटणाऱ्या कृतिशील समाजसुधारकांची कर्मभूमी म्हणून ओळखली जाते. समाजातील विविध घटकातील सुधारकांनी आपल्या कर्तृत्वाने अंधारात खिचपत पडलेल्या समाजाला प्रकाश दिला. अशा अनेक समाजसुधारकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अत्यंत श्रेष्ठ आहे. दलित कुटुंबात जन्मलेल्या बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अफाट बुध्दिमत्तेने एम.ए, पीएच.डी.,डी.एस्सी., एल.एल.डी., डी.लिट, बार ॲट लॉ यासारख्या देश विदेशातील अतिउच्च पदव्या प्राप्त केल्या. त्यांच्या विद्वत्तेची हेरॉल्ड लॉस्की, किंगस्ले मॉर्टिन, मॉरिस डॉब, एडिवन, सिडनी वेब, जॉन डयुई यासारख्या जागतिक कीर्तीच्या विद्वानांनी प्रशंसा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राप्त केलेल्या विविध पदव्या म्हणजे सामाजिक, शैक्षणिक व्यवस्थेवर मिळविलेला विजय होता. भगवान बुध्द,कबीर, म.फुले यांना आपले आदर्श व गुरूस्थानी मानून अज्ञान,अंधकार, दारिद्रय आणि जातियतेच्या श्रृंखलेत अडकून पडलेल्या दलितांसाठी तसेच समस्त भारतीयांसाठी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत कार्य करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 6 डिसेंबर 1956 रोजी महानिर्वाण झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाणाने दलित चळवळीचा झंझावत काही अंशी मंदावला गेला असतानाच मराठी साहित्याच्या क्षितिजावर 1960 च्या दरम्यान दलित साहित्याचा क्रांतिकारी उगम झाला आणि एकूणच मराठी वाङ्मयाच्या कक्षा अधिक व्यापक स्वरूपात रूंदावू लागल्या. काव्य, कथा, आत्मकथन, कादंबरी, नाटक या वाङ्मय प्रकारांनी दलित साहित्य समाजासमोर आले. आतापर्यंतचे मूक हुंकार दलित साहित्याचा रूपाने बाहेर पडू लागले. अशा वेळी दलित साहित्याला नावारूपाला आणण्याचे त्याची मूलगामी समीक्षा करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दलितेत्तर समीक्षक डॉ.भालचंद्र फडके यांनी केले.

मराठी विषयाचे नामवंत प्राध्यापक, समीक्षक, विचारवंत, लेखक, वक्ते, संशोधक, अभ्यासक म्हणून डॉ.भालचंद्र फडके यांनी महाराष्ट्रात व मराठी साहित्यात आपले स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले. परंतु त्यांच्या कार्याची विशेष दखल घेतली गेली नाही. कर्नाटक राज्यातील धारवाड याठिकाणी 13 मे 1925 रोजी जन्म झालेल्या भालचंद्र फडके यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत, वेळ प्रसंगी अनेक छोटया–मोठया नोकऱ्या करीत आपले शिक्षण पूर्ण केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्यु. सोसायटी 'च्या औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयात भालचंद्र फडके यांनी मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून 1955 ते 1961 या सहा वर्षाच्या काळात काम केले. या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी भारावलेल्या भालचंद्र फडके यांना डॉ.आंबेडकरांचा जवळून सहवास लाभला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी विजयादशमी रोजी भारताच्या मातीत जन्मलेला व संपूर्ण जगभर पसरलेला आपल्याच पूर्वजांचा बौध्द धम्माचा स्वीकार आपल्या लाखो बांधवांसह नागपूरच्या दीक्षा भूमीवर केला. या पवित्र दिनाचे साक्षीदार असणारे भालचंद्र फडके लिहितात,".....जेंव्हा मी विचार करू लागतो तेव्हा माझ्यासमोर उभे राहते ते नागपूरचे दीक्षा मैदान, बौध्द धर्म स्वीकारण्यासाठी देशाच्या कोनाकोपऱ्यातून आलेला पाच सहा लाखांचा जनसमुदाय, बौध्द धम्माची दीक्षा देण्यासाठी आलेले भिक्कू महाथेरो चंद्रमणी आणि त्यांचे सहकारी, देशविदेशातील पाहुणे, सुगंधी फुलांच्या माळांनी सजविलेला रंगमंच आणि एक ऐतिहासिक निर्णय घेऊन दलितांच्या मुक्तिसंग्रामाच्या नव्या पर्वाचा आरंभ करणारे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

धीरगंभीर डॉ.बाबासाहेब आंबेडकर ! हा सुवर्ण दिवस मी कसा विसरू शकेन"[1] डॉ. आंबेडकरांच्या विचार कार्यांनी प्रभावित झालेल्या भालचंद्र फडके यांनी नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर धर्मांतर कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जवळजवळ सहा लाख दलित बांधवांच्या विशाल जनसमुदयासमोर प्राचार्य म. भि. चिटणीस लिखित 'युगयात्रा' हे नाटक सादर केले. "नागपूरच्या प्रयोगाचे दिग्दर्शन व नभोवक्त्याचे काम माझ्याकडे होते"[2] असे अभिमानाने सांगणाऱ्या भालचंद्र फडके यांची कर्तव्यदक्षपणाची साक्ष पटते.

डॉ.भालचंद्र फडके यांनी मराठी साहित्यात अनेक साहित्यकृती निर्माण करून आंबेडकरी विचार तळागाळापासून उच्चवर्गीयांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. "डॉ.आंबेडकरांचे कार्य, त्यांच्या चळवळी त्यांचे विचार हा माझा अभ्यासाचा एक विषय आहे. या विषयाचे अध्ययन आणि तत्संबंधी संशोधन गेली 40 वर्ष मी सतत करीत आहे. एक नम्र अभ्यासक हीच माझी भूमिका."[3] असे ते प्रांजळपणे स्पष्ट करतात. डॉ.आंबेडकरांच्या विचार कार्यांनी प्रभावित झालेले भालचंद्र फडके "एकेकाळी सोलापुरातल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेचा प्रमुख असलेला माझा मोठा भाऊ आंबेडकरवादी कसा झााला. याच त्याच्या वर्गमित्रांना कोड पडतं."[4] असे. य.दि. फडके म्हणतात. डॉ.भालचंद्र फडके यांच्या साहित्य संपदेतील बहुतांशी ग्रंथ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर व दलित साहित्य यांच्याशी संबंधित आहेत. दलित साहित्य : वेदना व विद्रोह, दलित साहित्याची प्रकाशयात्रा, फुले आंबेडकर शोध व बोध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर (चरित्र) डॉ. आंबेडकर आणि गांधीजी (नाटक), डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य, डॉ.आंबेडकर यांच्या चळवळीचा परामर्श, डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीविषयक चिंतन, डॉ.आंबेडकरांचे समाजचिंतन, Selected Writtings and speeches of Dr. B.R.Ambedkar इत्यादी ग्रंथावर नजर टाकल्यास डॉ. भालचंद्र फडके यांची आंबेडकरी निष्ठा लक्षात येते.

साठोत्तरी कालखंडातील दलित साहित्याचे पुरस्कर्ते, समर्थ भाष्यकार अशी ओळख असणारे डॉ. भालचंद्र फडके स्वत दलित नसूनही प्रस्थापितांकडून दलित साहित्यावर जे वैचारिक हल्ले होत होते किंवा जो विरोध होत होता त्या हल्ल्यांची तसेच विरोधाची पर्वा न करता ते परतवून लावण्याचे काम डॉ. फडके यांनी अत्यंत समर्थपणे केले. ते निर्भिड, निगर्वी आणि निर्भय व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी दलित साहित्याचे नावीन्य व वेगळेपण ओळखले. व ते ऐतिहासिक दृष्टीने स्पष्ट केले. 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह' या दलित साहित्यावरील समीक्षा ग्रंथामुळे डॉ.फडके दलित साहित्यातील पहिल्या समीक्षकांच्या पिढीमध्ये अग्रस्थानी आहेत. त्यांनी आपल्या समीक्षा ग्रंथातून  दलित साहित्य, प्रेरणा, स्वरूप, विशेष, वाटचाल इत्यादी बरोबरच आंबेडकरी नवोदित लेखकांना नवी ओळख देण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. त्यांचे दलित साहित्य : वेदना व विद्रोह,कथाकार खानोलकर, मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, दलित साहित्याची प्रकाशयात्रा हे समीक्षा ग्रंथ विशेष प्रसिध्द आहेत. त्यांची समीक्षा ही लेख, प्रस्तावना, परीक्षणे, भाषणे, चर्चा अशा विविध स्वरूपात आढळते. त्यांच्या समीक्षा लेखनावर बुध्दिवादी व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभाव दिसून येतो. त्यांचा दलित साहित्य वेदना व विद्रोह हा समीक्षा ग्रंथ संदर्भ ग्रंथ म्हणून अत्यंत उपयुक्त दर्जाचा ठरतो.

डॉ.भालचंद्र फडके हे परिवर्तनवादी विचारवंत आहेत. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक या समाजभिमुख प्रमुख विषयांचे विचार मंथन केले. त्यांनी आपल्या लेखनातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय यांची भूमिका बजावली. त्या दृष्टीने फुले आंबेडकर : शोध व बोध, डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीविषयक चिंतन, सत्यशोधक पत्रकार, खरंच माझा देश स्वतंत्र आहे काय? हे त्यांचे मराठी वैचारिक ग्रंथ विशेष महत्त्वाचे ठरतात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

डॉ.भालचंद्र फडके यांनी समीक्षा व वैचारिक लेखनाबरोबरच इतर काही ललित लेखन केलेले आहे का? याबाबत वाचकांमध्ये अनभिज्ञता आढळते. मात्र ऐन 22/23 वर्षाच्या उमेदवारीच्या काळात त्यांनी कथा लेखन केलेले आहे. त्याविषयी ते म्हणतात, "1948 च्या वसंत दिवाळी अंकात फडके आडनावाचा 7/8 लेखकांच्या कथा प्रसिध्द झाल्या होत्या. त्यात मीही एक लेखक होतो".[5] भालचंद्र फडके यांनी नंतर कथा लेखन लिहिण्याचे थांबवले असले तरी त्यांच्या साहित्य निर्मिती प्रवाहाचा उगम येथूनच झाला. पुढे समीक्षा व वैचारिक अंगाने त्यांचे लेखन भरगच्च होत गेले असले तरी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर (चरित्र) डॉ.आंबेडकर आणि गांधीजी, विद्रोहाचे पाणी पेटले आहे (एकांकिका) असे ललित लेखन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्रातून चरित्रकार डॉ. भालचंद्र फडके यांनी डॉ.आंबेडकर यांचे विषयक अनेक सूक्ष्म गोष्टींचा तपशीलवार विचार मांडला आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक असा विविध पातळयांवरून डॉ.आंबेडकरांचे विचार जनसामान्यांपर्यत पोहोचविणे, हा त्यांचा चरित्रलेखनामागील उद्देश या ग्रंथाव्दारे सार्थ झाल्याचे दिसते. मराठी चरित्र वाङ्‌मयात डॉ.आंबेडकर यांचे विषयक जी काही महत्त्वपूर्ण चरित्रे आढळतात. त्या विविध चरित्रांमध्ये आणि धनंजय कीर, चांगदेव खैरमोडे, शंकरराव खरात, बी.सी.कांबळे अशा चरित्रकारांमध्ये डॉ.भालचंद्र फडके यांचे चरित्रकार म्हणून स्थान मौलिक असल्याचे दिसते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व म.गांधी या दोन महापुरूषांवर आधारित व दोघांच्या सखोल विचार कार्याचे मूल्यमापन करणारे 'डॉ.आंबेडकर आणि गांधीजी' हे नाटक डॉ.भालचंद्र फडके यांनी लिहिले. केवळ 64 पृष्ठ संख्येच्या या नाटकामध्ये नाटककार डॉ.भालचंद्र फडके यांनी डॉ.आंबेडकर व महात्मा गांधी या दोघांना एकमेकांचे विरोधक म्हणून समोरासमोर उभे न करता दोघेही आपआपल्या ठिकाणी कसे श्रेष्ठ होते, हे तटस्थपणे व समन्वयवादी भूमिकेतून मांडले आहे. या नाटकास महाराष्ट्र शासन पुरस्कार मिळाला. यावरून या नाटकाचे मूल्य लक्षात येते. नाटकाप्रमाणेच डॉ.भालचंद्र फडके यांनी 'पाणी पेटले आहे आणि इतर एकांकिका' या नावाचे एकांकिका लेखन केले. या एकांकिकेमध्ये मी जागाच आहे, पाणी पेटले आहे, काळ, काम आणि वेग, श्री.सावित्रीबाई फुले अशा चार छोटेखानी एकांकिकांचा समावेश असून हया विषयागर्भ स्वरूपाच्या आहेत. समीक्षक, विचारवंत म्हणून ख्याती असलेल्या डॉ.भालचंद्र फडके यांची सामाजिक जाणीव तीव्र असल्याने आपोआपच त्यांच्या लेखनातून म.फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे विषय येतात. मी जागाच आहे व पाणी पेटले आहे या दोन एकांकिका पुणे व जळगाव आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित झालेल्या आहेत. यावरून या एकांकिकांचे महत्त्व स्पष्ट होते. एकूणच डॉ.भालचंद्र फडके यांनी चरित्र,नाटय, एकांकिका लेखन करून ललित लेखकांमध्ये आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले ते दुर्लक्षित करता येत नाही.

डॉ.भालचंद्र फडके यांच्या समीक्षा, वैचारिक, ललित लेखनाचा थोडक्यात परामर्श घेतल्यानंतर असे लक्षात येते की, डॉ.फडके त्यांच्यावर आंबेडकरी विचारांचा प्रचंड प्रभाव दिसतो. त्यांनी वेळोवेळी दलित साहित्याचा पुरस्कार केला. ते दलित साहित्याची बाजू नेहमीच भक्कमपणे मांडत राहिले. दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सांगताना "आपल्या वाणीचे व लेखणीचे घणाघात घालून त्यांनी साक्षात 'मातीतून माणूस' निर्माण केला. म्हणून तर प्रत्येक दलित लेखकाचे स्फूर्तिस्थान, श्रध्दास्थान डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आहेत".[6] हे समर्थपणे पटवून दिले. ते दलित साहित्य व चळवळ यांच्या पाठीशी सदैव राहिले म्हणून त्यांची 'दलित फडके' अशी संभावनाही झाली. पण आपणावर होणाऱ्या निंदा नालस्तीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. "म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, त्यांचे तत्वज्ञान, त्यांच्या चळवळी, महाराष्टातील समाजपरिवर्तनवादी विचारधारा, मराठी साहित्यातील नवे प्रवाह यांचे अध्ययन करणारा मी एक अभ्यासक"[7] अशी संयतशील भूमिका घेऊन डॉ.भालचंद्र फडके यांनी फुले–आंबेडकर यांची समाजप्रबोधनाची शिकवण स्वीकारली व स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी मूल्यांचा पुरस्कार

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

केला. एकूणच मराठी साहित्यात वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण करणारे समीक्षक, विचारवंत, लेखक, वक्ते म्हणून डॉ.भालचंद्र फडके यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. तसेच साठोत्तरी कालखंडात निर्माण झालेल्या दलित साहित्याचे पुरस्कर्ते व दलित साहित्याचे भाष्यकार म्हणून त्यांचे विचार व वाङ्‌मयीन कार्य लक्षवेधी ठरताना दिसते.

संदर्भ टीपा :–

1. भालचंद्र फडके – दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन पुणे 2000 पृष्ठ 10
2. भालचंद्र फडके – दलित रंगभूमी, सुरेश एजन्सी पुणे 1984 प्रस्तावना
3. भालचंद्र फडके – डॉ.आंबेडकरांचे समाजचिंतन, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई 1989 पृष्ठ 9
4. गंगाधर पानतावणे (संपा.) – अस्मितादर्श डॉ.भालचंद्र फडके गौरव विशेषांक, 2000, पृष्ठ 42
5. गंगाधर पानतावणे संपा. –अस्मितादर्श डॉ.भालचंद्र फडके गौरव विशेषांक, 2000, पृष्ठ 33
6. भालचंद्र फडके – दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन पुणे 2000 पृष्ठ 43
7. भालचंद्र फडके – डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य प्रचार प्रकाशन, कोल्हापूर 1989 मनोगत